| | | जिल्हा परिषद रत्नागिरी<br>भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,<br>माळनाका रत्नागिरी ४१५६१२ | |
|---|---|---|---|
| | | आरोग्य विभाग | |
| दुरध्वनी क्रमांक<br>०२३५२-२२१४०३ | | बेटी बचाओ, बेटी पढाओ | ईमेल आयडी<br>dhozpratnagiri@gmail.com |

जा.क्र.रजिप/आवि/आस्था-२/ 956-978 /२०२६ दिनांक 11 FEB 2026

वाचले:-

१. म.शा. सा.प्र.वि.शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/प्र.क्र. ३७/९९/१६ अ. दिनांक ०५ मार्च, २००२.
२. म. शा. वित्त विभाग, शा.नि. क्र. असंक/०३/१००१/प्र.क्र.२० (भाग ५) वित्तीय सुधारणा १. दि.०७ जून, २००४.
३. वित्त विभाग, शा. नि. क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९ (भाग-६) २००४/वित्तीय सुधारणा -१. दि. ०१ जुलै, २००४.
४. ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र, मागास-७०४/प्र.क्र. ११०/आस्था-७, दिनांक ०७ जुलै, २००४.
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब, दि.२६.१०.२००४.
६. सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. २४ ऑगस्ट, २००६,
७. म.शा. सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक बीबीसी/२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.१३ मार्च, २००७.
८. सा.न्या.व विशेष सहाय्य विभाग, शा.नि.क्र. सीबीसी १०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५. दिनांक १६ मे, २००७.
९. म.शा.सार्वजनिक आरोग्य विभाग पदआ/२००६/१२८/प्र.क्र.१९/आरोग्य २. दिनांक ०६ ऑगस्ट, २००७.
१०. म.शा.सा.प्र.विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का. दिनांक १२ सप्टेंबर, २०१६.
११. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्हो-२०१५/प्र.क्र.५६६/का-१२, दिनांक ०८.०१.२०१६,
१२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या-१२, दि. १५.१२.२०१७.
१३. म.शा.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२/१६ व. दि.२९.१२.२०१७.
१४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९.
१५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/कार्या-१२. दि. ०१.०८.२०१९.
१६. ग्राम विकास विभागाकडील पत्र जा.क्र. दिव्यांग-२०१९/प्र.क्र.७७८/आस्था-७, दिनांक २५.११.२०१९.
१७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१.
१८. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र दिव्यांग २०२५/प्र.क्र/६७/आरक्षण-१ दि.३१.०७.२०२५
१९. ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. वेतन-२०२५/प्र.क्र/१३८(ई.क्र.१२७६१८१)/आ.४ दि.१३.१०.२०२५
१९. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १७.१२.२०२५.
२०. ग्राम विकास विभाग कडील पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५६५/आस्था-१२ दिनांक ३१ डिसेंबर २०२५.
२१. परिचर संवर्गाची अंतिम सेवा ज्येष्ठता सूची दिनांक ०१.०१.२०२५.
२१. पदोन्नती समिती सभा दिनांक १३.०१.२०२६.

आदेश :-

खालील परिचर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार PAY BAND PB १ रु. २६४००-८३६०० मधील एस -९ (अधिक शासन नियमानुसार भत्ते या वेतन श्रेणीत आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर खालील अटी व शर्तीना अधिन राहून पदोन्नती देणेत येत आहे.

| अ.क्र. | आरोग्य सेवक (पु) चे नांव | सामाजिक प्रवर्ग | पदोन्नती पदावर निवडीचा प्रवर्ग | कार्यरत ठिकाण /कार्यालय / तालुका | पदोन्नतीने दिलेले नियुक्तीचे ठिकाण प्रा.आ.केंद्र / तालुका |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.सुनिल सुर्यकांत जाधव | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैद्यकीय दवाखाना संगमेश्वर | उपकेंद्र दाभोळे प्रा.आ.केंद्र देवळे ता.संगमेश्वर |
| २ | श्री. संभाजी शिवाजी जाधव | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | शिक्षण विभाग पंचायत समिती खेड | उपकेंद्र सवेणी प्रा.आ.केंद्र तिसंगी ता.खेड |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | श्री.नरेंद्र मारुती महाडीक | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | बांधकाम उपविभाग कार्यालय गुहागर | उपकेंद्र तिवरे प्रा.आ.केंद्र दादर ता.चिपळूण. |
| ४ | श्री.हेमंत महादेव ठाकूर | अनु. जमाती | सामाजिक आरक्षण विरहित | पंचायत समिती, लांजा | उपकेंद्र वाडगांव प्रा.आ.केंद्र शिपोशी ता.लांजा |
| ५ | श्री. महेंद्र बुधाजी डिगोरे | इ.मा.व. | सामाजिक आरक्षण विरहित | तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय चिपळूण | उपकेंद्र बामणोली, प्रा.आ.केंद्र रामपूर ता.चिपळूण |
| ६ | श्री.मयुर मनोहर सावरटकर | अनु. जाती | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैद्यकीय दवाखाना खोपी ता.खेड | उपकेंद्र मांडवे प्रा.आ.केंद्र तळे ता.खेड |
| ७ | श्री.दिपक पांडुरंग मोहिते | अनु. जाती | सामाजिक आरक्षण विरहित | जिल्हा परिषद ग्रा.पा.पु. विभाग उपविभाग खेड | उपकेंद्र कळंबणी खुर्द, प्रा.आ.केंद्र आंबवली ता.खेड |
| ८ | श्री. निलेश कमलाकर छत्रे | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैद्यकीय दवाखाना तुरंब,ता.चिपळूण | उपकेंद्र कोंडमळा, प्रा.आ.केंद्र सावर्डा ता.चिपळूण |
| ९ | श्री. विनायक रामचंद्र पवार | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैद्यकीय दवाखाना पाचल ता.राजापूर | उपकेंद्र कुरंग, प्रा.आ.केंद्र रिंगणे ता.लांजा |
| १० | श्री.देविदास रामलाल देवरे | अनु.जमाती | सामाजिक आरक्षण विरहित | प्राथमिक आरोग्य केंद्र पिसई ता. दापोली | उपकेंद्र गुडघे, प्रा.आ.केंद्र दाभोळ ता.दापोली |
| ११ | श्री.उत्तम वसंत भगत | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | प्राथमिक आरोग्य केंद्र पावस ता.जि.रत्नागिरी | उपकेंद्र गावडे आंबेरे, प्रा.आ.केंद्र पावस ता.जि.रत्नागिरी |
| १२ | श्री. नवनाथ परसराम कोळी | वि.मा.प्र. | सामाजिक आरक्षण विरहित | प्राथमिक आरोग्य केंद्र कोळवली ता.गुहागर | उपकेंद्र कोळवली तिसंग प्रा.आ.केंद्र कोळवली ता.गुहागर |
| १३ | श्री.विजयसिंह वामनराव चव्हाण | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | प्राथमिक आरोग्य केंद्र ओणी ता.राजापूर | तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय लांजा |
| १४ | श्री. विश्वनाथ गंगाराम घाणेकर | इ.मा.व. | सामाजिक आरक्षण विरहित | प्राथमिक आरोग्य केंद्र मालगुंड ता. जि.रत्नागिरी | उपकेंद्र माभळे, प्रा.आ.केंद्र वांद्री ता.संगमेश्वर |
| १५ | श्री. सुनिल शामराव अलकुंटे | वि.जा.अ. | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैकीय दवाखाना वाटद(खंडाळा) ता.जि.रत्नागिरी | उपकेंद्र लाजुळ, प्रा.आ.केंद्र जाकादेवी ता.जि.रत्नागिरी |
| १६ | श्री.उदयकुमार शंकर पाटील | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | प्राथमिक आरोग्य केंद्र कोळवली ता.गुहागर | उपकेंद्र जुवाठी, प्रा.आ.केंद्र केळवली, ता.राजापूर |
| १७ | श्री.प्रविण मधुकर कोळी | वि.मा.प्र. | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैद्यकीय दवाखाना पुणस ता.लांजा | उपकेंद्र वरवेली बु. प्रा.आ.केंद्र भांबेड ता.लांजा |
| १८ | श्री.अमोल युवराज रनवरे | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैद्यकीय दवाखाना जुवाठी ता.राजापूर | उपकेंद्र प्रिंदावण, प्रा.आ.केंद्र कुंभवडे ता.राजापूर |
| १९ | श्री. विनोद चिंतामणी दराडे | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | प्राथमिक आरोग्य केंद्र वहाळ ता.चिपळूण | उपकेंद्र कुंभार्ली, प्रा.आ.केंद्र शिरगांव ता.चिपळूण |
| २० | श्री.वैभव जयवंत घागरे | खुला | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैद्यकीय दवाखाना तुंबाड ता.खेड | उपकेंद्र टेरव, प्रा.आ.केंद्र सावर्डा ता.चिपळूण |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१ | श्री. नंदकिशोर विक्रम गायकवाड | अनु.जाती | सामाजिक आरक्षण विरहित | सामान्य प्रशासन विभाग, जि.प.रत्नागिरी. | उपकेंद्र फणसवळे, प्रा.आ.केंद्र हातखंबा, ता.जि.रत्नागिरी |
| २२ | श्री. दिनेश यशवंत वरक | भ.ज.क | सामाजिक आरक्षण विरहित | पशुवैद्यकीय दवाखाना दाभोळे ता. संगमेश्वर | उपकेंद्र आंबव,प्रा.आ.केंद्र माखजन ता.संगमेश्वर |
| २३ | श्री. रविंद्र मधुकर डोर्लेकर. | वि.मा.प्र. | सामाजिक आरक्षण विरहित | बांधकाम विभाग, जि.प.रत्नागिरी | उपकेंद्र खानवली, प्रा.आ.केंद्र वाडीलिंबू ता.लांजा |

अटी व शर्ती :-

* जिल्हा परिषद सेवेतील गट-ड (परिचर) हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून पात्रता व ज्येष्ठतेच्या अधिन, खालील निकष पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने, म्हणजे, -

१. विज्ञान या विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य अर्हता परीक्षा उत्तीर्ण आणि सदरचे सेवाप्रवेश नियम प्रसिद्ध झालेल्या दिनांकापूर्वी जिल्हा परिषद सेवेत असलेल्या गट-ड (परिचर) पद धारण करणाऱ्या आणि तीन वर्ष नियमित सेवा करणाऱ्या आणि ज्यांनी माध्यमिक शालान्त परिक्षा उत्तीर्ण केली आहे. अशा व्यक्ती देखील जेष्ठतेच्या अधिन राहुन सदरचे सेवाप्रवेश नियम प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पूढील पाच वर्षांपर्यंत पदोन्नतीसाठी पात्र राहतील.

२.पदोन्नती पात्र कर्मचाऱ्यांना शासनाच्या विभागीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडून घेण्यात येणारा बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) किंवा शासनाने समकक्ष ठरवलेल्या इतर संस्थेतील अभ्यासक्रम तीन संधीमध्ये यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

३. आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा उत्तीर्ण केलेली नसेल अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसेल तर, नियुक्तीनंतर संबंधित नियमांत नमूद केलेल्या विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

४.आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, संगणक अर्हता प्रमाणपत्रा संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमांत नमूद केलेल्या विहीत मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास, सदर संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

५.आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर नामनिर्देशनाद्वारे नेमणुकीसाठी शिफारस केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश व अनुदेश यानुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

६.लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर केल्याच्या तारखेला दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्यास संबंधित उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र राहील.

७.एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर तिला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास, ती शासकीय सेवेत सदर पदावर सेवा चालू ठेवण्यास अपात्र ठरेल.

८.कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश किंवा निर्णय यामध्ये विर्निदिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील, या नियमान्वये नियुक्ती केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास लागू राहतील.

११. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १६-ब यांचा शासन निर्णय दिनांक ०७.०५.२०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरणेत येत आहेत.

अ) सदरची पदोन्नती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून लोकहितास्तव देणेत आलेली आहे.

ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचा-यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच जेष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

क) सदरची पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७६/२०२१ व रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७८/२०२१ मधील आय.ए. (स्टॅम्प) क्र. १०९१०/२०२१ व १०९११/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहून करणेत येत आहे.

ड) सदरची पदोन्नती अस्तित्वात असलेल्या बिंदू नामावली / जेष्ठता यादी नुसार देणेत आली आहे. जेष्ठता यादीमध्ये / बिंदू नामावलीमध्ये बदल झाल्यास अथवा आरक्षणासंबंधी कोणताही प्रश्न उदभवल्यास पदोन्नतीबाबत फेर विचार केला गेल्यास एखाद्या कर्मचा-यांस पदावनत केले जाईल. तेव्हा त्या बाबत त्यास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही.

इ)उक्त कर्मचा-यांनी हे आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांमध्ये आरोग्य सेवक (पु) या पदावर रुजू होणे आवश्यक आहे.

ई) संबंधित परिचर यांनी आरोग्य सेवक (पुरुष) पदावरील तात्पुरती पदोन्नती नाकारल्यास उक्त संदर्भ क्रमांक ११ व १६ मध्ये उल्लेख केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित कर्मचा-यांचे नाव सन २०२५-२६ च्या निवड सूचीतून काढून टाकण्यात येईल आणि, पुढील दोन वर्षी (सन २०२६-२७ व २०२७-२८) होणा-या निवड सूचीमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिस-या वर्षाच्या निवडसूचीत (सन २०२८-२९) आरोग्य सहाय्यक (पुरुष) पदावरील तात्पुरत्या पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल. तसेच पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यास कालबध्द पदोन्नती/सुधारीत सेवान्तर्गत आश्वासित प्रगती योजनेन्तर्गत पदोन्नती पदाच्या वेतन निश्चितीचा लाभ घेतलेल्या कर्मचा-याच्या पदोन्नती पदाच्या वेतन श्रेणीचे लाभ काढून घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

ऊ) वरील कर्मचारी यांना देणेत येणारी पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणतीही पूर्वसूचना न देता अगर कारण न दर्शविता कर्मचा-याला केव्हाही पदावनत करणेत येईल.
वरील कर्मचा-यांना देणेत आलेली पदोन्नती ही सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णयानुसार मंजूर पदांच्या आढाव्याच्या अधिन राहून देणेत येत आहे. सदर आकृती बंधानुसार पदांमध्ये बदल झाल्यास पदोन्नती केलेल्या वरील कर्मचा-यांना पदावनत करणेत येईल, या अटीवर सदरची पदोन्नती देणेत आली आहे.

ऐ) संबंधित कर्मचा-यांनी पदोन्नतीनंतर ग्राम विकास विभागाने निर्गमित केलेल्या क्र. डीएसआर/२४८६/सीआर/१६४५/१८, दिनांक २७.०६.१९८६ नुसार वेतन पुनर्निश्चिती तरतुदीनुसार पदोन्नती पदावरील वेतनाची निश्चिती मुदतीनंतर महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील १९ (१) प्रमाणे केली जाईल. तथापि यापूर्वी आश्वासित प्रगती योजनेचा पहिला दुसरा लाभ दिला असलेस वेतन पुर्ननिश्चितीची आवश्यकता नाही, त्यानुसार त्यांचे वेतन संरचनेत कोणताही बदल होणार नाही.
ओ) हे आदेश तात्काळ अंमलात येतील. पदोन्नत झालेल्या आरोग्य सेवक (पु) यांना संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांनी कार्यमुक्त करुन तसेच रुजू करुन घेतल्याच्या आदेशाच्या प्रती आरोग्य विभागाला पाठविणेत याव्यात.

**सदरचे आदेश निगमित केलेल्या तारखेपासून ३० दिवसांचे आंत कार्यमुक्त करणेत यावे. जे कर्मचारी पदोन्नती स्विकारण्यास असमर्थता दर्शवित असतील अशा कर्मचा-यांचे लेखी निवेदन घेऊन वरील मुदतीत या कार्यालयाकडे सादर करणेत यावे.**
पदोन्नतीने हजर झालेपासून एक महिन्यांचे आत संबंधित कर्मचाऱ्याने वेतन निश्चिती करीता विकल्प द्यावयाचा आहे.

सही/-XXX
(वैदेही रानडे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत माहितीकरीता व कार्यवाही करीता.
१.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी
२.गट विकास अधिकारी पंचायत समिती.........
३. तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती ..........
४.वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र ......... ता...........
२/- वरील प्रमाणे कार्यवाही करून अहवाल सादर करण्यात यावा.

(वैदेही रानडे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी